SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Special Cell – 2609148
Website : www.unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD – NIRF- 28th Rank

जा.क्र.विशेष कक्ष/ All college/67 दिनांक 1 AUG 2017

प्रति,

मा.संचालक/प्राचार्य,
मान्यता प्राप्त सर्व शैक्षणिक संस्था.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय: शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची बिंदुनामावली प्राथमिक तपासणीसाठी सादर करताना आवश्यक असणा–या कागदपत्रासह सादर करावयाचा प्रस्ताव.

महोदय/महोदया,

विद्यापीठाशी संलग्नीत असलेली महाविद्यालये/ परिसंस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची बिंदुनामावली सामान्य प्रशासन विभागाच्या दि–०५/११/२००९ रोजीच्या परिपत्रकानुसार विद्यापीठास (विशेष कक्ष विभागास) सादर केली जाते. बिंदुनामावली प्राथमिक तपासणी सादर करताना संस्थाकडून/महाविद्यालयांकडून काहीवेळा कागदपत्रे अपुर्ण स्वरूपात किंवा चुकीची सादर केली जातात. परिणामी त्यासंबधीची त्रुटीपुर्तता करण्यासाठी कालापव्य होतो याबाबी टाळण्यासाठी आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की,

संस्थेची/महाविद्यालयाची शिक्षक/शिक्षकेतर सेवकांची बिंदुनामावली विद्यापीठास प्राथमिक तपासणीसाठी सादर करताना सोबतच्या नमुना अर्जाप्रमाणे सादर करावी. म्हणजे बिंदुनामावली प्राथमिक तपासणीची कार्यवाही जलद पूर्ण करता येणे शक्य होईल.

कळावे,

आपला विश्वासू

उपकुलसचिव

**विशेष सुचना–१) बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणीची कार्यवाही विद्यापीठाकडून पुर्ण करून घेतल्या शिवाय. मा. सहा.आयुक्त, (मावक), पुणे कार्यालयाकडून बिंदुनामावली अंतिम तपासणीची तारीख घेवू नये.**

**२) विद्यापीठाकडून प्राथमिक तपासणी पुर्ण झाल्यानंतर तीन महिन्यात मा.सहा.आयुक्त मावक, पुणे यांच्याकडून अंतिम तपासणी करून घ्यावी विलंब झाल्यास त्यांच्याकडून तपासणी करून दिली जात नाही याची नोंद घ्यावी.**

**महाविद्यालयाची/ संस्थांची शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची बिंदुनामावली प्राथमिक तपासणीसाठी सादर करावयाचा प्रस्ताव अर्जाचा नमुना**

प्रति.

प्रति,
मा.प्रभारी प्र.कुलगुरू.
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय:— बिंदुनामावलीच्या प्राथमिक तपासणीसाठी प्रस्ताव

महोदय,

संस्थेचे नाव:—........................................................................
महाविद्यालयाचे नाव:—...............................................................
संपर्कासाठी महाविद्यालयाचे/संस्थेचे दुरध्वनी क्र. व ई मेल ..............
महाविद्यालयाचे संकेतस्थळ.........................................................

| अ.क्र | रोस्टर तपासणीसाठी प्रस्तावासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील | सोबत जोडला आहे | जोडपत्राचा पृष्ठ क्र |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालय अनुदानित असल्यास विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयाची सन १९९९—२००० सालातील पद मान्यता (संचमान्यता) सोबत जोडली आहे | होय/ नाही | |
| २ | बिंदूनामावलीतील सर्व शिक्षक/ शिक्षकेत्तर संवर्गातील मंजूर पदे सन १९९९—२००० च्या शासनाच्या पदमान्यतेनुसार (संचमान्यतेनुसार) घेऊन आरक्षण, अनुशेष हे त्यानुसार निश्चित करण्यात आले आहे | होय/ नाही | |
| ३ | सन १९९९—२००० च्या पदमान्यते शिवाय एखाद्या विषयाची/ संवर्गाची अधीकची पदे बिंदूनामावलीत घेतली असून अधिकच्या पदाला मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांची विशेष मान्यता सोबत जोडली आहे | होय/ नाही/ लागू नाही | |
| ४ | बिंदूनामावलीतील सर्व नोंदी आरक्षण विषय प्रचलित नियमानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या सहीशिक्क्यानिशी प्रमाणित केल्या आहेत (कृपया प्र—प्राचार्यांच्या सहीशिक्क्याने नोंदी प्रमाणित करू नयेत तसेच प्राचार्य पदाची बिंदूनामावली संस्थेचे नियुक्ती प्राधिकारी यांनी प्रमाणित करावी.) | होय/ नाही | |
| ५ | बिंदूनामावलीत समाविष्ट सर्व शिक्षकशिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश, हजर निवेदन जन्म तारखेची नोंद, शाळा सोडल्याचा दाखला, संबंधित शासन मान्यता यांच्या सत्य प्रती सोबत जोडल्या आहेत | होय/ नाही | |
| ६ | बिंदूनामावलीत मागास प्रवर्गावर नियुक्त झालेल्या सर्व मागासवर्गीय शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या जातवैधता प्रमाणपत्राच्या प्रती सोबत जोडल्या आहेत (ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची जातवैद्यता प्रमाणपत्रे सोबत सादर केलेली नाहीत त्या विषयाची/संवर्गाची बिंदुनामावली प्राथमिक तपासणीसाठी स्विकारली जाणार नाही.) | होय/ नाही | |
| ७ | आमचे महाविद्यालय विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित असून विद्यापीठाच्या संलग्नता टी.१ विभागाकडून मिळालेली पदमान्यता सोबत जोडली आहे. तसेच, महाविद्यालयातील एखादे पद (सेवानिवृत्ती, राजीनामा, मयत, सेवतून कमी) या कारणास्तव रिक्त झाले असल्यास अशा पदांना संलग्नता टी.१ विभागाकडून सुधारित पदमान्यता घेतली आहे. | होय/ नाही | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | बिंदूनामावलीतील एखाद्या सेवकाच्या सेवेशी संबंधित अथवा एखाद्या पदाशी संबंधित बाब कोणत्याही न्यायालयात / ट्रॅब्युनल न्यायप्रविष्ठ नाही. या संदर्भात नियुक्ती प्राधिकारी यांच्या सहीशिक्यानिशी प्रमाणित करून हमीपत्र सोबत जोडले आहे | होय / नाही | |
| ९ | मा.सहा.आयुक्त, (मावक), विधान भवन, पुणे यांनी यापुर्वी केलेल्या अंतिम तपासणी अहवालाची प्रत सोबत सादर केली आहे. | होय / नाही. | |
| १० | यापूर्वी संस्था/ महाविद्यालयाने मा. सहा. आयुक्त पुणे कार्यालयाकडून बिंदूनामावलीची अतिंम तपासणी केली असल्यास त्याचा अहवाल व त्यासंदर्भात संबंधित कार्यालयाने नियुक्ती आधिकाऱ्यांच्या आरक्षणासंदर्भात खुलासा मागितला असला तर त्या खुलाशाच्या प्रति सोबत जोडल्या आहेत काय? | होय / नाही / लागू नाही | |
| ११ | बिंदूनामावली मध्ये एकूण पृष्ठांबाबतचे (पासून—पर्यंत) पृष्ठे संख्या नमुद करून नियुक्ती अधिकारी यांचे बिंदुनामावलीच्या शेवटच्या पृष्ठावर सही व महाविद्यालयीन मुद्रा/सील सह प्रमाणित केली आहे. | होय / नाही | |
| ११ | बिंदूनामावलीमध्ये प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विशेषत: वर्ग—४ यांच्या सेवानिवृत्ती दिनांक शासन प्रचलित नियमानुसार नोंदी नमुद करण्यात आल्या आहेत. व सेवाजेष्ठता यादी, बिंदुनामावली महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे, त्याची Link पुढील प्रमाणे आहे. | | |
| १२ | महाविद्यालय/ संस्था यांनी बिंदूनामावलीच्या प्राथमिक तपासणीसाठी माहीतगार प्रतिनिधीचे नाव, हुदद्दा, मोबाईल क्रमांक, ई—मेल इ.माहिती नमुद करावी. | | |

टिप— १) बिंदुनामावलीमध्ये सफेद शाई Whitener चा कोणत्याही परिस्थितीत वापर करण्यास किंवा त्यावर कागद चिटकवून मूळ नोंदी नष्ट करण्यास मनाई आहे. सफेद शाईचा वापर झालेला दिसून आल्यास त्या नोंदी व बिंदुनामावली ग्राहय मानण्यात येणार नाही व त्याची प्राथमिक तपासणी केली जाणार नाही.

२) बिंदुनामावलीमध्ये कोणत्याही सुधारणा/दुरूस्त्या दर्शविण्याची काही विशिष्ट परिस्थिती आवश्यकता भासल्यास सदरची बाब संस्था/महाविद्यालयाचे नियुक्ती प्राधिकारी यांच्या निदर्शनास आणून व विद्यापीठाकडून (विशेष कक्ष विभाग) यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन दुरूस्त्या कराव्यात परस्पर केलेल्या कोणत्याही सुधारणा/दुरूस्त्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

शिक्का

स्वाक्षरी
संचालक/सचिव/प्राचार्य